११ जुलाई 2005

पथकिनारवर्ती नियमात एकसूत्रता आणण्यासाठी इमारत रेषा व नियंत्रण रेषा याकरीता घ्यावयाची अंतरे.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
**पूरक पत्र क्रमांक - आरबीडी-२००४/प्र. क्र. २६/रस्ते-७**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
दिनांक - ०७ जुलै, २००५.

वाचा - १) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक-आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७, दिनांक ९ मार्च, २००१

२) पूरकपत्र, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक आरबीडी-१००१/७२/रस्ते-७, दिनांक २१ सप्टेंबर, २००१.

३) शुध्दीपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक आरबीडी-१००१/७२/रस्ते-७, दिनांक ७ जानेवारी, २००२.

४) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक डोंविका-१०८९/प्र.६६/योजना-१९, दिनांक २२ नोव्हेंबर, १९९०

पूरकपत्र

पथकिनारवर्ती नियमात एकसुत्रता आणण्यासाठी शासन निर्णय क्रमाक आरबीडी १०८१/८७१/रस्ते-७, दिनांक ९ मार्च, २००१ अन्वये पथकिनारवर्ती नियमानुसार इमारत रेषा व नियंत्रण रेषा याकरीता सुधारीत अंतरे लागू करण्यात आलेली आहेत. या शासन निर्णयातील नागरी व अनागरी भाग, औद्योगिक भाग तसेच डोंगराळ भाग (तळटीप क्रमांक १ च्या संबंधात) इत्यादी संज्ञांच्या व्याख्या खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

अ) **नागरी व नगरेतर भाग - "नागरी क्षेत्र"** याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केलेले क्षेत्र असा आहे. आणि **"नगरेतर क्षेत्र"** या शब्दप्रयोगाचा अर्थ त्यानुसार लावला जाईल".

ब) **डोंगराळ भाग (तळटीप क्र. १ चे स्पष्टीकरण)** - "प्रत्यक्षात रस्त्याच्या कडेच्या बाजूस डोंगर किंवा घाटमार्ग आहे किंवा प्रत्यक्षात जागा डोंगराळ (दुर्गम) आहे असा भाग"

मात्र भौगोलिक भूप्रदेश डोंगराळ भाग म्हणून निश्चित होण्यासाठी खालील निकषांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

i) एखाद्या क्षेत्राचा उतार **(Slope)** ३० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असेल व रिलेटीव्ह रिलिफ ३०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास तो प्रमुख डोंगरी भाग होईल.

ii) परंतु जर हा उतार ३० टक्क्यांपेक्षा कमी व १७ टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास असे क्षेत्र अंशतः डोंगरी भाग होईल.

(कृ. मा. पहावे)

ROTA/H 624 (750-7-05) 1

14 जुलाई JUL 2005

D:\...WAS\RBD-2.doc

iii) एखादे डोंगरी क्षेत्र १०० चौ. कि. मी. किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास डोंगरी क्षेत्र समजण्यात यावे.

क) **औद्योगिक भाग** - "औद्योगिक भाग म्हणजे महाराष्ट्र शासनाने राजपत्राव्दारे औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र".

ड)) **रस्त्याचा मध्य** - रस्ता हद्दीचा मध्य.

ई) **सेवा रस्ता बांधण्यात आल्यास घ्यावयाची अंतरे** - सेवा रस्ता महानगरपालिका/नगरपालिका हद्दीमध्ये कोणीही बांधला असल्यास त्या त्या महानगरपालिका/नगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार त्यावर पुढील सामासिक अंतर सेवा रस्त्यापासुन अनुज्ञेय राहील. उर्वरित अनागरी भागासाठी त्या क्षेत्रासाठी लागू असलेल्या विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीनुसार पुढील सामासिक अंतर अनुज्ञेय राहील किंवा जेथे प्रादेशिक योजना मंजूर झाली असेल तर त्यामधील विकास नियंत्रण नियमावलीनुसार पुढील सामासिक अंतर लागू राहील.

सदर पूरक पत्र नगर विकास विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र. १२४/ न. वि. १२, दिनांक ७/१/२००५) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर. टी. गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मंत्री, (सा. बां./सा.उ.), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सा. बां.) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (सा. बां./सा.उ. व.), यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव (महसुल), महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्ते व इमारती कार्यासनातील सर्व अधिकारी व कार्यासने.
सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नेपियनसी रोड, मुंबई
सर्व मुख्य अभियंते (विद्युत वगळून)
सर्व महसूल आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, सेंट्रल बिल्डींग, पुणे.
सर्व अधीक्षक अभियंते (विद्युत वगळून)
सर्व कार्यकारी अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत वगळुन)/सर्व जिल्हापरिषद.
सर्व महानगरपालिका/नगरपालिका
निवड नस्ती कार्यासन रस्ते-७

H 624-1 W